# BDC LIBRARY

## News Paper Clipping

## A.Y. 2025-26

महाराष्ट्र न्यूज

https://mahanewsnet.com/ DailyMaharashtraNewsOfficial 8554047000
@DailyMaharashtraNews Maharshtranewslive @Maharashtranew7

# ओझोन वाचवा पर्यावरण वाचवा : डॉ. एस.आर. सुपनेकर



* महाराष्ट्र न्यूज नेटवर्क

पाटण, दि. २५ सप्टेंबर : पृथ्वीच्या वाढत्य तापमानामुळे संपूर्ण जगभरातील देशांपुढे आज समस्या निर्माण झाली आहे. वाढत्या ग्लोबल वॉर्मिंगमुळे पृथ्वीच्या वातावरणामध्ये खूप मोठे बदल घडून येत आहेत. अतिनील किरणांमुळे पृथ्वीवरील सजीवांवर हानिकारक परिणाम होत आहेत यामधू जर आपणास सुटका हवी असेल तर पृथ्वी हरित करणे तसेच ओझोन थराचे संरक्षण करणे ही काळाची गरज बनली आहे तसेच ओझोन वाचवा पर्यावरण वाचवा असे मत संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस.आर. सुपनेकर यांनी व्यक्त केले. ते बी.डी. कॉलेजमध्ये ओझोन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते.

कोयना एज्युकेशन सोसायटीचे बी.डी. कॉलेज, पाटण भूगोलशास्त्र विभाग व निसर्गप्रेमी मंडळ, आय. क्यू. ए. सी. यांच्यातर्फे ओझोन दिवस निमित्ताने कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून संख्याशास्त्र विभाग प्रमुख डॉ. एस. आर. सुपनेकर तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार तर प्रमुख उपस्थिती म्हणून भूगोलशास्त्र विभाग प्रमुख डॉ. संदीप तडाखे, आय.क्यू.ए.सी. समन्वयक डॉ. हेमलता काटे, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख प्रा.डी. डी. थोरात यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रा. डी. डी. थोरात यांनी निसर्गप्रेमी मंडळ याबाबत थोडक्यात माहिती सांगितली. त्यानंतर डॉ. संदीप तडाखे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले कार्यक्रमाचा उद्देश व निसर्ग प्रेम मंडळ मार्फत घेण्यात

विद्यार्थ्यांना दाखविण्यात आल्या तसेच स्पर्धेमध्ये यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांना बक्षीस देवून सत्कार करण्यात आला. नंतर प्रमुख पाहुणे एस.आर. सुपनेकर यांनी ओझोन थर याचे महत्व सांगितले. सूर्यापासून निघणारी अतिनील किरणे माणसामध्ये व इतर प्राण्यामध्ये विविध आजार उत्पन्न करू शकतात. आपल्या पृथ्वीवरील सजीवसृष्टीला सुरक्षित ठेवण्यात ओझोन थराचा मोठा वाटा आहे. त्याचबरोबर त्यानी मॉन्ट्रियल करार याबद्दल माहिती सांगितली निसर्ग सौंदर्य तसेच सजीवसृष्टी जर वाचवायची असेल तर झाडे नुसती लावून चालणार नाही तर ती जगवली पाहिजेत, वाढवली पाहिजेत, प्रदूषण कमी केले पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले. अध्यक्षीय मनोगतात डॉ. एच.व्ही. काटे म्हणाल्या की, पर्यावरण रक्षण हे आपना सर्वांचे प्रथम काम आहे. ओझोन थराच्या महत्त्वाविषयी आणि त्याच्या संरक्षणाबद्दल जनजागृती करणे हा या दिवसाचा मुख्य उद्देश आहे असे मत व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या शेवटी डॉ. संतोष पाटील यांनी आभार प्रदर्शन केले.तसेच सूत्रसंचालन प्रा.गंगाराम चव्हाण यांनी केले.यावेळी प्रा. डॉ. भरत जाधव, प्रा. प्रदीप गायकवाड, प्रा. श्रीगणेश